मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पोलीस आयुक्तालयासाठी मिळाली जागा

## जाधववाडी-चिखलीत साकारणार पोलीस आयुक्तालय : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाची मिळाली मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळाली आहे. जाधववाडी-चिखली येथील गट नंबर ५३९ मधील नऊ एकर जमीन पोलीस आयुक्तालय कार्यालय, निवासस्थान आणि कवायत मैदानाकरिता देण्यास राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने मान्यता दिली. या ठिकाणी सुसज्ज कार्यालय उभारण्यात येणार आहे.




शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती १५ ऑगस्ट २०१८ मध्ये करण्यात आली. आयुक्तालयाचे कामकाज सुरु होऊन सहा वर्षे झाली. परंतु, आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळालेली नव्हती. देहूगाव गायरान येथील ५० एकर जागा पिंपरी-चिंचवड आयुक्तालयासाठी देण्याबाबत राज्य शासनाने मंजुरी दिली होती. मात्र, या जागेला देहू देवस्थान, स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. त्यासाठी ग्रामस्थांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली होती. ही जागा उपलब्ध होण्यास विलंब आणि अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे मोशी येथील गायरान जागेचीही पोलीस आयुक्तालयासाठी पाहणी केली होती. परंतु, त्या जागेचाही पर्याय मागे पडला.

सहा वर्षांपासून पोलीस आयुक्तालयास स्वतंत्र जागा, शासकीय इमारत उपलब्ध नाही. सध्याचे पोलीस आयुक्त कार्यालयसुद्धा महापालिका शाळेच्या इमारतीमध्ये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सुरु आहे. कामकाजाच्या दृष्टीने ही जागा अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे पोलीस आयुक्त कार्यालय तसेच इतर कार्यालये, कवायत मैदान, क्रीडांगण व निवासस्थाने यासाठी जागा मिळण्याकरिता पोलिसांनी शासनाला प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार जाधववाडी, चिखली येथील गट नंबर ५३९ मधील ३ हेक्टर ३९ आर जागेत आयुक्तालयाची भव्य वास्तू उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. या शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करावा लागेल. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरू करणे बंधनकारक राहील, अशा अटींवर या जागेला मान्यता देण्यात आली आहे. पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या मालकीची वाकड पेठ क्रमांक ३९ येथील डिस्ट्रीक सेंटरमधील १५ एकर जागाही यापूर्वीच मिळाली आहे. येथे अधिकारी, कर्मचा-यांसाठी निवासस्थाने आणि तांत्रिक कार्यालय उभारण्याचे नियोजन आहे. श्वान पथकासाठी (डॉग स्क्वॉड) फौजदार, अधिकारी कर्मचारी देण्यासही शासनाने मान्यता दिली.

### चिखली परिसर प्रशासकीय संस्थांचा केंद्रबिंदू

**» पोलीस आयुक्तालय उभारण्यासाठी चिखलीत जागा निश्चित करण्यात आली. पिंपरी-चिंचवड न्यायालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, मोशी रुग्णालय, राज्यघटना भवनही या भागातच उभारले जात आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र या भागात आहे. त्यामुळे समाविष्ट गावांतील हा परिसर आता प्रशासकीय संस्थांचा केंद्रबिंदू म्हणून नावारुपाला येत आहे.**

“ पोलीस आयुक्तालय महापालिकेच्या इमारतीच्या जागेवर भाडेतत्वावर आणि अपु-या जागेत होते. त्यामुळे विविध अडचणी येत होत्या. चिखलीत नऊ एकर जागा उपलब्ध झाली आहे. वास्तुविशारदामार्फत डिझाइन तयार केली जाईल. लवकरच प्रत्यक्षात बांधकामाला सुरुवात केली जाणार आहे. न्यायालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोलीस आयुक्तालय जवळच होत असल्याने नागरिकांना फायदा होईल.

- विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

# महापालिकेने झटकली ओल्या कचऱ्याची जबाबदारी

## ओला कचरा प्रक्रियेची जबाबदारी सोसायट्यांवर : क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे सोसायट्यांना पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने १५ जुलैपासून गृहनिर्माण सोसायट्यांमधील ओला कचरा उचलण्यात येणार नाही. कच-यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी सोसायट्यांवरच दिली आहे. सुका कचरा महापालिका उचलणार आहे. त्यामुळे महापालिका आणि गृहनिर्माण सोसायटी यांच्यात ओला व सुका कच-यावरून वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा करणे, तसेच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. घर, परिसर, व्यवसाय या ठिकाणी उत्पन्न होणारा ओला, सुका कचरा वेगवेगळा करणे हे कायदेशीर बंधनकारक आहे. महापालिका परिसरातील विविध भागातील कचरा गोळा करण्याची जबाबदारी ही महापालिकेवर



आहे. ओला आणि सुका कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने नागरिकांना तीन प्रकारच्या कुंड्या दिल्या होत्या. या संदर्भातील परिपत्रक यापूर्वी आयुक्तांनी काढले होते. गृहनिर्माण सोसायट्यांबरोबरच हॉटेल, मंगल कार्यालये, खाणावळ, वसतिगृह, उपाहारगृह, शाळा, महाविद्यालये, मंडई व कृषी उत्पन्न बाजार समिती यांना हे बंधन महापालिकेने घातले आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत हा नियम करण्यात आला आहे. या संदर्भात क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने संबंधितांना याबाबतचे जनजागृतीपर पत्र पाठवण्यात आले आहे.

दरम्यान, गृहनिर्माण संस्था, आस्थापनांनी मोठ्या प्रमाणात उत्पन्न होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर त्याच ठिकाणी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. ती यंत्रणा उभारून सुका कचरा महापालिकेस देण्याकरिता यापूर्वी वेळोवेळी मुदत दिली होती. तथापि अद्यापही ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ तरतुदी उल्लंघन करणारी असल्याचे महापालिकेने म्हटले आहे.

# पुणे शहर करणार रेबिजमुक्त

## राज्यातील पहिले शहर ठरणार : पालिकेच्या आरोग्य विभागात कृतिदलाची स्थापना, नसबंदी, शस्त्रक्रियेवर भर

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या धोरणानुसार राज्यातील पुणे शहर हे २०३० पर्यंत रेबिज मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागात कृतिदलाची स्थापना केली असून कुत्र्यांची नसबंदी तसेच शस्त्रक्रियेवर भर दिला जाणार आहे.

रेबिज निर्मूलनासह शहरातील नागरिकांच्या आणि प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणार आहे. नागरिकांमध्ये रेबिज विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी सत्तर टक्के प्रतिकारशक्ती (हार्ड इम्युनिटी) तयार करण्याचा प्रयत्न असणार असल्याची माहिती पुणे महापालिकेचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यांनी दिली.



रेबिज आजारावर उपचार नाहीत. प्रतिबंधात्मक उपाययोजना हाच एकमेव मार्ग आहे. कुत्रा चावल्यामुळे होणारा रेबिज हा आजार जीवघेणा असून वेळीच योग्य उपचार मिळाले तरच जीव वाचवता येऊ शकतो. कुत्रा चावल्यानंतर वैद्यकीय उपचारांबाबत खूप कमी प्रमाणात जनजागृती आहे. त्यामुळे रेबिजमुळे गेल्या वर्षी पुणे शहरात सहा तर शहराबाहेरील तब्बल ५२ जणांचा मृत्यू झाला आहे.

केंद्र सरकारच्या रेबिज निर्मूलन अभियानात राज्यातील पुणे आणि मुंबई ही दोन शहरे २०३० पर्यंत रेबिजमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने कृतिदलाची (टास्कफोर्स) स्थापना केली आहे.

### गेल्या दीड वर्षांत 35,973 जणांना कुत्र्याचा चावा

» या वर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यात १२,९८५ पुणेकरांना कुत्र्याने चावा घेतला आहे. गेल्या दीड वर्षात ३५,९७३ जणांना कुत्र्याने चावा घेतल्याची नोंद महापालिकेच्या आरोग्य विभागात आहे. महापालिकेच्या शहरातील कमला नेहरू, राजीव गांधी या मुख्य रुग्णालयात तसेच ५० दवाखान्यात ॲंटिरेबिजची लस उपलब्ध आहे. ही लस मोफत रुग्णाला उपलब्ध असल्याची माहिती डॉ. सारिका फुंडे यांनी दिली.

पुणे शहरात भटक्या आणि मोकाट कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण विविध संस्थांच्या माध्यमातून होते. ब्लूक्रॉस सोसायटी, ॲनिमल वेल्फेअर असोसिएशन, युनिवर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी अशा संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी पुणे शहरातील भटक्या कुत्र्यांना ॲंटिरेबिज लस दिली जाते. गेल्या साडेसहा वर्षांत या संस्थांनी ५७,४७४ कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया केली तसेच ॲंटिरेबिजची लस दिली आहे. पुणे शहर २०३० पर्यंत रेबिज मुक्त होणार असल्याचा दावा पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे. त्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने कंबर कसली आहे.

# शहरात आणखी दोन गर्भवतींना झिकाचा संसर्ग

## झिकाबाधित गर्भवतींचे प्रमाण वाढत असल्याने चिंता वाढली : पुण्यातील रुग्णसंख्या पोहोचली 15 वर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात झिकाबाधित रुग्णांची संख्या वाढू लागल्याने काळजी व्यक्त केली जात आहे. झिकाचा संसर्ग गर्भवती महिलांसाठी धोकादायक आहे, असे असतानाच सोमवारी येरवड्यातील गर्भवतीनंतर मंगळवारी (दि. ९) आणखी दोन गर्भवती महिलांसह एका तरुणाला झिकाचा संसर्ग झाल्याची नोंद झाली.

पाठोपाठ झिकाची लागण झालेल्या गर्भवती महिलांची नोंद होत असल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाची काळजी वाढली असून गर्भवती महिलांना काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे, तसेच महापालिकेकडून योग्य काळजी घेतली जात असल्याचे सांगण्यात आले आहे. शहरातील झिकाबाधित रुग्णांची संख्या १५ वर पोहोचली आहे. यात आठ गर्भवतींचा समावेश आहे. शहरात आतापर्यंत आढळून आलेल्या रुग्णसंख्येमध्ये गर्भवती महिलांचे प्रमाण अधिक असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.



बावधन भागातील उजवी भुसारी कॉलनी परिसरात १५ वर्षीय तरुणाला झिका संसर्ग झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पाषाण परिसरात १८ वर्षीय आणि १९ वर्षीय या दोन गर्भवतींनाही झिकाच्या संसर्गाचे झाल्याचे निदान झाले आहे. यातील १८ वर्षीय महिला ही २८ आठवड्यांची गर्भवती असून तिच्यामध्ये सांधेदुखी, डोकेदुखीची लक्षणे आढळून आली आहेत. १९ वर्षीय महिला ही २३ आठवड्यांची गर्भवती आहे. तिच्यामध्ये घसा खवखवण्याची लक्षणे दिसून आली आहेत. सध्या या दोन्ही गर्भवतींची प्रकृती स्थिर असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. शहरात आतापर्यंत आढळून आलेल्या रुग्णसंख्येमध्ये गर्भवती महिलांचे प्रमाण वाढत असल्याने शहरातील गर्भवती महिलांची तपासणी करण्याचे आदेश महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिले आहेत.

### झिकाचा महिलांना जास्त धोका

» शहरात आतापर्यंत झिकाचे १५ रुग्ण आढळून आले आहेत. यात पुरुष रुग्णांची संख्या केवळ चार आहे. तर महिला रुग्णांची संख्या ११ असून यात आठ गर्भवतींचा समावेश आहे.

रुग्णसंख्येत गर्भवती महिलांना झिका विषाणूचा अधिक धोका असल्याचे समोर आले आहे. शहरात आतापर्यंत आठ गर्भवतींना झिकाचे निदान झाले आहे. यात एरंडवणे परिसरातील दोन, पाषाण परिसरातील तीन, मुंढवा, आंबेगाव बुद्रुक आणि कळस परिसरातील एका महिलेचा समावेश आहे. झिका विषाणूमुळे गर्भवतींची मुदतपूर्व प्रसूती, गर्भपात, बाळामध्ये जन्मत: दोष उद्भवणे यासारख्या गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे गर्भवतींमधील हा धोका टाळण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून गर्भवतींचे सर्वेक्षण आणि संशयितांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच आरोग्य विभागाकडून आज मुंढवा, पाषाण, खराडी आणि कळस परिसरातील ३१ महिलांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी एनआयव्हीकडे पाठवले आहेत.

> कीटक प्रतिबंधक विभागाकडून आळीनाशक उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरातील गर्भवतींची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच गर्भवती महिलांचे समुपदेशन केले जात आहे. खासगी रुग्णालयात असे रुग्ण आढळून आल्यास तत्काळ महापालिकेच्या आरोग्य विभागाला कळविण्यात यावे, असे स्पष्ट केले आहे.
>
> **- डॉ. कल्पना बळिवंत, आरोग्य प्रमुख, प्रभारी.**

# ठेकेदार व पालिका अधिकाऱ्यावर कारवाई होणार

## मुख्यमंत्र्यांनीच केली घोषणा : निकृष्ट रस्त्यांचा विषय विधीमंडळात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाची देयके काढून केलेल्या गैरव्यवहारातील दोषी ठेकेदारकडून वसुली करून दोषी ठेकेदार, महापालिका कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिवेशनात केली.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या मुंबई येथील सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात आज (दि.9) आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील जानेवारी 2022- 23 कोट्यवधी रुपयाच्या डांबरी व सिमेंट कॉंक्रीटकरणाची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याच्या 44 तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्या.

त्यामुळे या रस्त्यांच्या कामाच्या दर्जा व गुणवत्ता तपासणी करणेबाबत कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे यांच्यामार्फत करून या कामातील दोषी ठेकेदार व निकृष्ट दर्जाची रस्त्याची कामे करणारे संपूर्ण देयेके देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत सभागृहात तारांकीत प्रश्न उपस्थित केला होता.

याला लेखी उत्तरात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत निविदा दराच्या 40 टक्क्यांपेक्षा पेक्षा कमी दराने स्वीकृत करण्यात आलेल्या निविदांपैकी 15 रस्त्यांच्या कामांचे गुणवत्ता व दर्जा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे ह्या त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येऊन कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे यांनी दिलेले अहवालामध्ये काही रस्त्यांची गुणवत्तामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत.

त्यामुळे या रस्त्यांची कामांची ठेकेदारांकडून दुरुस्ती व रक्कम वसूल करून याबाबत सीओईपीने दिलेल्या अहवालातील शिफारशीनुसार निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची कामे केलेल्या दोषी ठेकेदारांकडून रकमेची वसुली व संबंधित रस्त्यांचे कामावर देखभाल करणाऱ्या महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासित केले.

महापालिका हद्दीतील १५ रस्त्यांच्या कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी आमदार अश्विनी जगताप यांनी मंगळवारी (दि. ९) अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला. या प्रकरणात काही रस्त्यांची गुणवत्तेत त्रुटी आढळून आल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. तसेच, तपासणी अहवालानुसार या प्रकरणात दोषी ठेकेदार, अधिका-यांवर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहे.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मंगळवारी आमदार जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील जानेवारी २०२२-२०२३ या वर्षातील कोट्यवधी रुपयांच्या डांबरी व सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांच्या कामांबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी ही कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याच्या ४४ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या रस्त्यांच्या कामाच्या दर्जा व गुणवत्ता तपासणी करण्यासाठी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे यांच्यामार्फत करून या कामातील दोषी ठेकेदार, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाईबाबत विचारणा केली होती. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले. १५ रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता व दर्जा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली होती. त्यांनी दिलेल्या अहवालामध्ये काही रस्त्यांची गुणवत्तामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत.

या रस्त्यांची कामांची ठेकेदारांकडून दुरुस्ती व रक्कम वसूल करून घेण्यात येणार आहे. तसेच, अहवालातील शिफारशीनुसार निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांची कामे केलेल्या दोषी ठेकेदारांकडून रस्त्यांची दुरुस्ती व रकमेची वसुली केली जाणार आहे. तसेच, संबंधित रस्त्यांचे कामावर देखभाल करणाऱ्या पालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे आश्वासन दिले आहे.



### मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील रस्त्याच्या कामामध्ये मागील दोन-तीन वर्षापासून सातत्याने महापालिका अधिकारी व ठेकेदाराच्या संगनमताने सुरू असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाला या कारवाईने लगाम लागण्याची शक्यता आहे. महापालिकेतील अधिकारी राजकीय दबाव झिडकारून करदात्या नागरिकांच्या पैशातून शहरात विकास कामे करताना शहराचे हित जोपासण्याचे काम करतील अशी आशा व्यक्त करत आमदार अश्विनी जगताप यांनीमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.**

### संगनमताने निकृष्ट कामे – आमदार अश्विनी जगताप

**» मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकरणात कारवाईचे समाधानकारक आश्वासन दिले आहे. मात्र, पालिकेतील रस्त्याच्या कामांमध्ये मागील दोन-तीन वर्षांपासून सातत्याने अधिकारी व ठेकेदाराच्या संगनमताने निकृष्ट दर्जाची कामे सुरू आहेत. या कार्यवाहीमुळे लगाम लागणार आहे. पालिका अधिकारी, कर्मचा-यांनी राजकीय दबाव झिडकारून करदात्या नागरिकांच्या पैशातून शहरात विकास कामे करताना पालिकेचे हित जोपासावे, ही अपेक्षा आहे, असे आमदार अश्विनी जगताप यांनी म्हटले आहे.**

# शहरातील डेंग्यची रुग्णसंख्या पोहचली बारावर

## डासोत्पत्ती स्थानधारकांकडून सव्वा दोन लाखांचा दंड वसूल, शहरातील डासोत्पत्ती ठिकाणांचा शोध घेण्याची मोहीम तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील डेंग्यू रुग्णांची संख्या वाढली असून, ती आता 12 वर पोचली आहे. त्यापैकी एका रुग्णावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, अन्य रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.तर ॲक्शन मोडवर आलेल्या वैद्यकीय विभागाने शहरातील डासोत्पत्ती ठिकाणांचा शोध घेण्याची मोहीम तीव्र केली आहे.

महापालिकेच्या किटकनाशक आणि औष्णिक धुरीकरण विभागाच्या वतीने 1 ते 9 जुलै या कालावधीत केलेल्या तपासणीत शहरातील विविध ठिकाणी डासांच्या अळ्या आढळून आल्याने 53 जणांवर डास उत्पत्ती स्थानांची निर्मिती या शिर्षकाखाली दंड प्रमाणांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.


तसेच 467 विविध आस्थापनांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. या कारवाईमध्ये एकूण 2 लाख 44 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

तपासणी पथकाच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी पाहणी करून एकूण 42 हजार 51 घरे तसेच 246 बांधकामांची तपासणी करण्यात आली. यामध्ये एकूण 889 घरांमध्ये डासांच्या आळ्या आढळल्या.

तसेच या पाहणीदरम्यान 141 टायर, पंक्चर भंगारांची दुकाने, 1 लाख 94 हजार 666 कंटेनर्सचीही तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 1 हजार 10 कंटेनर्समध्ये डासांच्या आळ्या आढळल्या होत्या. या ठिकाणी योग्य ती डास प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.

सध्या पावसाळा सुरु असल्याने ठिकठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यूचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. डेंग्यू संक्रमणाला प्रतिबंध घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात कंटेनर सर्वे केला जात आहे. मागील आठवड्यात १ लाख ३८ हजार ५६ घरांमधील तब्बल ६ लाख २८ हजार ४०६ कंटेनरची तपासणी केली.५०० टायर तसेच भंगार दुकांची तपासणी केली. तसेच, बांधकाम सुरु असलेल्या ४३५ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. डासोत्पत्ती करण्यास पोषक वातावरण निर्माण केल्याप्रकरणी एकूण ६७ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

डेंग्यूचा धोका ओळखून वेळीच त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कोणते उपाय करावेत, यासंदर्भात पिंपरीतील इंटरनल मेडिसिनचे कन्सल्टंट फिजिशियन डॉ.प्रसाद कुवलेकर यांनी नागरिकांना सूचना केल्या आहेत.




### डेंग्यूपासून पूर्णपणे स्वत:चे संरक्षण कसे करता येईल ?

**» कंटेनर नियमितपणे रिकामे स्वच्छ करून ठेवणे, पाणी साठविणारे कंटेनर झाकून आणि घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे काढून टाकल्यास डासांची संख्या कमी होऊ शकते. डीईईटी असलेले मच्छर प्रतिबंधक वापरणे, लांब बाही असलेले कपडे घालणे आणि मच्छरदाणीखाली झोपणे या उपायामुळे देखील संरक्षण होऊ शकते. फॉगिंग आणि कीटकनाशक फवारण्यासारखे सामुदायिक प्रयत्न उच्च जोखीम असलेल्या भागात डासांची संख्या नियंत्रित करण्यात मदत करतात.**

# वीज वितरण कार्यालयातील बिबट्या अखेर जेरबंद

## राजगुरूनगर (चांडोली) येथील वीज वितरण विभागाच्या मीटर टेस्टिंग कार्यालयात बिबट्या घुसला होता

**पुणे | प्रतिनिधी**

राजगुरूनगर (चांडोली) येथील वीज वितरण विभागाच्या मीटर टेस्टिंग कार्यालयात बिबट्या घुसला. तेथे काम करणाऱ्या वरिष्ठ तंत्रज्ञ शांता शेळके यांच्या सतर्कतेमुळे बिबट्याला जेरबंद करण्यात आले. तब्बल एक तास रेस्क्यू चालले.

राजगुरूनगर शहरालगत असलेल्या चांडोली गावात गेली पाच सहा दिवस बिबट्याचा वावर होता. एका सदनिकेत तो चार दिवसांपूर्वी घुसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

रोज त्याचे वास्तव्य चांडोली गावात होते. चांडोली (राजगुरूनगर) येथील वीज वितरण विभागाच्या कार्यालयाशेजारी असलेल्या वीज मीटर टेस्टिंग कार्यालयात आज (दि.१०) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास आला काही कर्मचाऱ्यांनी त्यास येताना पाहिले.

त्यांनी आरडाओरडा केला. त्यावेळी तो कार्यालयाच्या लगत असलेल्या मीटर टेस्टिंग येथे घुसला. यावेळी तेथे काम करीत असलेल्या महिला वरिष्ठ तंत्रज्ञ शांता संभाजी शेळके यांनी सतर्कता दाखवत कार्यालयाचे गेट बंद केले.

बिबट्या पकडण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले आहे. बिबट्या वीज मंडळाच्या कार्यालयात घुसल्याची बातमी समजतात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. जुन्नर येथून रेस्क्यु टीम आल्यानंतर बिबट्याला जेरबंद केले.



### रेस्क्यु टीम आल्यानंतर बिबट्या जेरबंद

» कार्यालयाच्या लगत असलेल्या मीटर टेस्टिंग येथे घुसला. यावेळी तेथे काम करीत असलेल्या महिला वरिष्ठ तंत्रज्ञ शांता संभाजी शेळके यांनी सतर्कता दाखवत कार्यालयाचे गेट बंद केले. बिबट्या पकडण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले आहे. बिबट्या वीज मंडळाच्या कार्यालयात घुसल्याची बातमी समजतात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. जुन्नर येथून रेस्क्यु टीम आल्यानंतर बिबट्याला जेरबंद केले.

### महिला कर्मचाऱ्याने प्रसंगावधान

» सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास आला काही कर्मचाऱ्यांनी त्यास येताना पाहिले. त्यांनी आरडाओरडा केला. त्यावेळी तो कार्यालयाच्या लगत असलेल्या मीटर टेस्टिंग कार्यालयात घुसला राजगुरूनगर (चांडोली) येथील वीज वितरण विभागाच्या मीटर टेस्टिंग कार्यालयात बिबट्या घुसला. तेथे काम करणाऱ्या वरिष्ठ तंत्रज्ञ शांता शेळके यांच्या सतर्कतेमुळे बिबट्याला जेरबंद करण्यात आले.

बिबट्या जेरबंद करण्यासाठी वन विभागाचे धिकारी प्रदीप रौंधळ, सागर तांबे, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल गुरव, पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राऊत, संतोष घोलप, संकेत कवडे, सागर शिंगाडे, धीरज भासे, निलेश कोळसे, सागर भोर, जुन्नर वर्ड वाईल्ड सॉसचे डॉ महेंद्र ढोरे, डॉ अविनाश मिसलकर, आकाश डोळस, अपदाचे डॉ बापू सोनवणे, शांताराम गाडे, प्रफुल्ल टाकसाळे, नवनाथ काळोखे, सुजित नेहरे आदी ने रेस्क्यू केले.

दरम्यान जुन्नर वर्ड वाईल्ड सॉसचे डॉ महेंद्र ढोरे, डॉ अविनाश मिसलकर यांनी बिबट्याला बंदुकीतून भुलीचे इंजेक्शन मारले. 20 मिनिटांनतर बेशुद्ध झालेल्या बिबट्याला उचलून पिंजऱ्यात जेरबंद केले. जुन्नर बिबट निवारा केंद्रात त्याला पाठविण्यात आले.

राजगुरूनगर शहरालगत असलेल्या चांडोली गावात गेली पाच सहा दिवस बिबट्याचा वावर होता. एका सदनिकेत तो चार दिवसांपूर्वी घुसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.रोज त्याचे वास्तव्य चांडोली गावात होते.

चांडोली (राजगुरूनगर) येथील वीज वितरण विभागाच्या कार्यालयाशेजारी असलेल्या वीज मीटर टेस्टिंग कार्यालयात सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास आला काही कर्मचाऱ्यांनी त्यास येताना पाहिले. त्यांनी आरडाओरडा केला. त्यावेळी तो कार्यालयाच्या लगत असलेल्या मीटर टेस्टिंग कार्यालयात घुसला.

# इंद्रायणी नदीतील पावसामुळे जलपर्णी गेली वाहून मात्र प्रदूष जैसे थेच

## औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीतील प्रदूषणाचा आवाज आज देशभर पोहोचला आहे. माऊलींचा पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त दि, 29 जुलै रोजी मुख्यमंत्री आळंदीत आले होते त्यावेळी इंद्रायणी नदी सुधारसाठी 800 कोटींचा निधी दिला आहे.

मात्र, पालखी प्रस्थान झाल्यानंतरही दोन ते चार दिवस इंद्रायणीनदी काळवंडलेलीच होती. सध्या मावळात सुरू असलेल्या पावसामुळे नदीला पाणी आले असून नदीतील जलपर्णी वाहून गेली असली तरी नदी प्रदूषितच असल्याचे आधूनमधून येणाऱ्या दुर्गंधीतून स्पष्ट होत आहे. सध्या वाहत्या पाण्याचा जोर असल्याने तवंग (फेस) निर्माण होत नाही



तेवढेच समाधान मानायला हवे एवढे मात्र नक्की.

पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे.

पिंपरी महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जिल्हा प्रशासन, ग्रामस्थांच्या पुढाकारातून नदी काठच्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचे

### आरोग्याचा प्रश्न गंभीर

» पावसाळा सोडला तर इंद्रायणीचा नदी हा उल्लेख नावापुरताच आहे. सध्या नागरीकरण वाढत असल्याने मोठ्या प्रमाणावर सांडपाणी व मैला कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात सोडला जात आहे. त्यातच पिंपरी-चिंचवड हद्दीतील औद्योगिक वसाहतीतून सांडपाण्यावर प्रक्रिया न करता थेट केमिकल मिश्रीत पाणी नदीत सोडण्यात येत असल्याने नदी कायमच फेसाळलेली असते. तर हेच पाणी अंगावर घेतल्यास नागरिकांना खाज सुटत असून आरोग्याचा गंभीरप्रश्न निर्माण झाला आहे.

नियोजन केले आहे. मात्र, वारंवार आळंदीत पाण्यावर तवंग येत असतो. एखाद्या अती थंड प्रदेशात ज्याप्रमाणे नदीवर बर्फाची चादर असते तशीच अवस्था इंद्रायणी नदीची मध्यतरी झाली होती.

नदी पात्रात लाखो वारकरी मोठ्या श्रद्धेने स्नान करून माऊलींचे दर्शन घेतात. परंतु नदीची अवस्था बघता लाखो वारकऱ्यांचे आणि आळंदीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आधीच जलपर्णीने इंद्रायणीचा श्वास गुदमरला होता. आता त्यात जलप्रदूषणाची भर पडली असून अवध्या नदी पात्रात तवंग वारंवार दिसून येतो. रसायनयुक्त पाणी सोडल्यानेच नदीची अशी अवस्था झाल्याची चर्चा परिसरात आहे.